## जाहिरात

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ कार्यालयाचे आस्थापनेवर रिक्त असलेले **विधी अधिकारी (गट-ब)** हे **पद पूर्णतः कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.** त्याकरिता www.mahaprisons.gov.in कारागृह विभागाच्या वेबसाईटवर सदर पदाकरीता दिलेल्या अटी/ शर्ती व शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असलेल्या **उमेदवारांकडून ११ महिन्यांसाठी पूर्णतः कंत्राटी पध्दतीने** नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अक्र | पदाचे नांव | एकूण पदे | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी (गट-ब) | ०१ | रुपये १५,००० + ५,००० |

**सूचना** : उमेदवाराने www.mahaprisons.gov.in कारागृह विभागाच्या या वेबसाईटवर दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **"विधी अधिकारी या पदासाठी अर्ज"** असे नमूद करुन **दिनांक १५.१०.२०२१** पर्यत कार्यालयीन वेळेत **(सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.४५ वा.)** अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१ येथील नोंदणी शाखा यांचेकडे सादर करावेत. **दिनांक १५.१०.२०२१ रोजी सायं. ०५.४५ वा नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.** अर्जदाराने अर्जामध्ये त्यांचा दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता लिहिलेले दोन लिफाफे अर्जासोबत जोडावेत.

अर्जाचा नमुना, अटी व शर्ती, करारातील मासिक देय रक्कम, विधी अधिकारी (गट-ब) शैक्षणिक अर्हता व अनुभव, विधी अधिकारी, गट-ब यांची कर्तव्ये व जबाबदा-या, तसेच अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र इत्यादी सविस्तर माहिती www.mahaprisons.gov.in कारागृह विभागाच्या या वेबसाईटवर उमेदवारांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : .०९.२०२१**

(अतुलचंद्र कुलकर्णी)
**अपर पोलीस महासंचालक व**
**महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

## जाहिरात

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाचे आस्थापनेवर रिक्त असलेले **विधी अधिकारी (गट-ब) हे पद पूर्णतः कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.** त्याकरिता www.mahaprisons.gov.in कारागृह विभागाच्या या वेबसाईटवर सदर पदाकरीता दिलेल्या अटी/ शर्ती व शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असलेल्या **उमेदवारांकडून ११ महिन्यांसाठी पूर्णतः कंत्राटी पध्दतीने** नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अक्र | पदाचे नांव | एकूण पदे | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| १ | **विधी अधिकारी (गट-ब)** | **०१** | **रुपये १५,००० + ५,०००** |

**सूचना** : उमेदवाराने www.mahaprisons.gov.in कारागृह विभागाच्या या वेबसाईटवर दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **"विधी अधिकारी या पदासाठी अर्ज"** असे नमूद करुन **दिनांक १५.१०.२०२१** पर्यत **कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.४५ वा.)** अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१ येथील नोंदणी शाखा यांचेकडे सादर करावेत. **दिनांक १५.१०.२०२१ रोजी सायं. ०५.४५ वा नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.** अर्जदाराने अर्जामध्ये त्यांचा दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता लिहिलेले दोन लिफाफे अर्जासोबत जोडावेत.

अर्जाचा नमुना, अटी व शर्ती, करारातील मासिक देय रक्कम, विधी अधिकारी (गट-ब) शैक्षणिक अर्हता व अनुभव, विधी अधिकारी, गट-ब यांची कर्तव्ये व जबाबदा-या, तसेच अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र इत्यादी सविस्तर माहिती www.mahaprisons.gov.in कारागृह विभागाच्या या वेबसाईटवर उमेदवारांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**अटी व शर्ती** :

१) सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीची असेल. उमेदवाराला शासकीय अधिकारी/ कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही. तसेच सदर पदावर हक्क सांगता येणार नाही.

२) सदर नेमणूक ही करार पध्दतीने प्रथमत ११ महिन्यासाठी करण्यात येईल. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविण्यात येईल. तथापि, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर खाजगी काम/ व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) उमेदवाराची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

५) उमेदवारांना मुलाखतीसाठी पाचारण करण्यात येईल त्यावेळी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

६) निवड करण्यात आलेल्या उमेदवाराकडून शासनाने विहित केलेल्या नमुन्यात करारपत्र ( Agreement) करुन घेण्यात येईल.

७) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८) उमेदवारांनी खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ३१.०८.२०२१ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

९) अर्जासोबत २.५ सें.मी. x २.५ सें.मी. आकाराचे सध्या काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत.

१०) विधी अधिकारी यांची करार पद्धतीने नेमणूक सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका क्र. १९००८-१९००९ महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्रमांक २०१८२/१२ श्री. नारायण तुकारामपंत जोशी आणि इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये दिनांक ०२/११/२०१२ रोजी निर्गमित केलेल्या अंतरिम आदेशाच्या तसेच मूळ याचिका क्रमांक ३४७८८/१२, ३४७७९/१२ तसेच स्पेशल लिव्ह पिटीशन क्रमांक ३६९६५/२०१२ व ३६९६७/२०१२ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून असेल.

करारातील मासिक देय रक्कम

अ) विधी अधिकारी गट-ब पदाकरिता करारातील मासिक देय रक्कम रु. १५,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी रु. ५,०००/- देय राहील. (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**विधी अधिकारी (गट-ब) शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विदयापिठाचा कायदयाचा पदवीधर असावा व तो सनदधारक असावा.

२) विधी अधिकारी, गट-ब या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३) उमेदवार सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञानसंपन्न असावा ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५) संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे.

६) उमेदवाराचे वय :

अ) विधी अधिकारी गट-ब या पदासाठी उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

किंवा

७) जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस प्रशासकीय व सेवाविषयक कायदयाविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या व्यक्ती निवडीस अपात्र रहातील.

**विधी अधिकारी, गट-ब यांची कर्तव्ये व जबाबदा-या :-**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवाविषयक/ प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकारणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-याचे मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाचे विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषांगाने अपील दाखल करण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झालेस अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले काम विहीत मुदतीत पार पाडणे.

८) बंद्याने उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीवर कारागृह नियम व इतर नियमांच्या अनुषंगाने शपथपत्र/ मुद्देनिहाय अभिप्राय सादर करणे.

९) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, विविध न्यायालये, मानवी हक्क आयोग व इतर वरिष्ठ कार्यालयास या कार्यालयाकडील अभिप्राय देणे.

१०) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

( अतुलचंद्र कुलकर्णी )
**अपर पोलीस महासंचालक व**
**महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

# अर्जाचा नमुना

| |
|---|
| एक फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा |

----------- पदाकरिता अर्ज
कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्रमांक
२. अर्ज स्वीकारल्याचा दिनांक
३. अर्ज स्वीकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासहित) -----------------

सूचना :

१. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजी मध्ये लिहावी. आवश्यक नसेल तेथे खोडावे.

२. अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

**अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती**

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

मराठीत --------------------------------

इंग्रजीत :

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२. पत्रव्यवहाराचा पत्ता : ---------------------------------------------------

तालुका : -------------- जिल्हा : -------------- पीन कोड : [ | | | | | ]

३. कायमचा पत्ता : ---------------------------------------------------------

तालुका : -------------- जिल्हा : -------------- पीन कोड : [ | | | | | ]

४. दूरध्वनी क्रमांक : ------------------ भ्रमणध्वनी : ----------------------

५. जन्मदिनांक : [ | | | | | | | ] जन्मस्थळ : ----------------

६. दिनांक ३१.०८.२०२१ रोजीचे वय दि. म. व. [ | | | | | ]

७.लिंग : पुरुष / महिला

८. धर्म ---------------------------- जात : ---------

९. क्रिमीलिअर आहे काय : होय / नाही

१०.महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का? होय / नाही

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

११. शैक्षणिक अर्हता

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव विद्यालय/ महाविद्यालय | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) | | | | | |
| २.उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी) | | | | | |
| ३.पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

१२. इतर शैक्षणिक अर्हता :

अ) संगणक प्रशिक्षित आहे काय? होय / नाही

ब) प्रत्यक्ष वकिली व्यवसायाचा किती वर्षाचा अनुभव आहे?

१३. अर्जदाराची इतर माहिती

अ) सनद घेतल्याची दिनांक :

ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशिल

| अक्र | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

**टीप :** अ.क्र.११,१२ व १३ मध्ये नमूद असलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत असणे आवश्यक आहे.

१४) अ- अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत अअक करण्यात/स्थानबध्द करण्यात/ बध्द करण्यात/ दंड करण्यात/ सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय? किंवा अनर्ह इरविण्यात आले आहे काय ? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/ संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय१ काढून टाकण्यात आले आहे काय ?

१४) ब- हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्या शैक्षणिक प्राधिकरणात/ संस्थेत उमेदवारांविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय?

**(१४-अ किंवा १४-ब चे उत्तर होय असेल तर अर्ज भरताना सदर खटला, अटक,** स्थानबध्द, दंड, दोषीसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय, विद्यापीठ, शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे.)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री/ सौ/कु. ---------------- याव्दारे प्रतिज्ञापूर्व असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/ नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यस त्याची पूर्णतः जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील. तसेच मी भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण अर्जदाराची सही

दिनांक दिनांकासहीत